नववर्षाच्या पार्श्वभूमीवर राज्य उत्पादन शुल्क विभाग सक्रीय
>> पान 2

आमदार खरात यांच्या संकल्पनेतून जानेफळ येथे एक सुर एक ताल कार्यक्रमाचे आयोजन
>> पान 3

सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी भाविक संत गजानन महाराजांच्या चरणी लीन
>> पान 4

सुविचार

आदर हा संवादाचा मुख्य आधार आहे.

दैनिक

# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034



‘मुलगी झाली हो’ फेम अभिनेता सिद्धार्थ खिरीडने दिली प्रेमाची कबुली, मिठीतील ‘ती’ मिस्ट्री गर्ल कोण?

आतील पान

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 139 ■ मंगळवार, दि. 31 डिसेंबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

# स्मार्ट रेशनकार्ड स्थलांतरीत कामगारांना प्राधान्याने द्या - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या कामांचा आढावा

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई / प्रतिनिधी : स्थलांतरित कामगारांवर लक्ष केंद्रीत करून त्यांना स्मार्ट रेशनकार्ड देण्यात यावे. त्याचबरोबर स्मार्ट कार्ड देताना ते कुठल्याही राज्यातील असले तरी त्यांना महाराष्ट्रात कुठल्याही रास्त-भाव दुकानात धान्य मिळेल, असे नियोजन करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. सह्याद्री अतिथीगृह येथे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या पुढील १०० दिवस आराखड्याच्या अनुषंगाने मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी आढावा घेतला.**

अन्नधान्य वाटपामध्ये लाभार्थ्यांना योग्य प्रमाणात धान्य वाटप व्हावे यासाठी सर्व रास्त भाव दुकानांमध्ये इलेक्ट्रॉनिक वजन काटे बसवावेत, सर्व शिधापत्रिका धारकांना स्मार्ट शिधापत्रिकांचे वितरण करण्यात यावे. लाभार्थ्यांना वेळेत अन्नधान्याचे वितरण होण्याच्या दृष्टीने ‘एक गाव एक गोदाम’ उभारण्याची कार्यवाही सुरू करावी. वाहनांचे जिओ टॅगीग करावे, अन्नधान्य वाटपामध्ये ‘एक देश एक शिधापत्रिका’ धोरण राज्यात राबवण्यात येत आहे. त्याअनुषंगाने स्थलांतरित मजुरांना अन्नधान्य वाटपामध्ये प्राधान्य देण्यात यावे. गरजू लाभार्थ्यांचा सण उत्सव उत्साहात साजरा व्हावा यासाठी राज्यात सणांच्या काळात आनंदाचा शिधा वाटप करण्यात येतो. या वाटपाची एक दिनदर्शिका तयार करण्यात यावी, अशा सूचनाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी केल्या.

आगामी वर्षात २५ लक्ष नवीन लाभार्थ्यांचे सार्वजनिक वितरण यंत्रणेसाठी समावेशन करून त्याचे ई-केवायसी करून प्रमाणीकरण करण्याच्या सूचना देत मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले की, मागील ६ महिन्यात एकदाही अन्नधान्याची उचल न केलेल्या शिधापत्रिकांची तपासणी करावी, शिधापत्रिकामधून मयत व्यक्ती वगळाव्या, १०० पेक्षा जास्त वय असणाऱ्या लाभार्थ्यांची फेरतपासणी



करावी. तसेच संगणकीकृत न झालेल्या १४ लक्ष लाभार्थ्याचे नाव शिधापत्रिकेत समाविष्ट करण्याकरिता विशेष मोहीम राबविण्याच्या सूचनाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी केल्या.

या बैठकीस अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री धनंजय मुंडे, सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार, ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे, वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, राज्यमंत्री योगेश कदम, मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, अपर मुख्य सचिव ओ.पी.गुप्ता, अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा, अपर मुख्य सचिव संजय सेठी, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव अश्विनी भिडे, प्रधान सचिव रणजीतसिंह देओल, प्रधान सचिव एकनाथ डवले, मुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ.श्रीकर परदेशी, सचिव विरेंद्र सिंह, सचिव रविंद्र सिंह, परिवहन आयुक्त विवेक भिमनवार तसेच वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## आ. सुरेश धस यांनी प्राजक्ता माळी यांच्या बाबत केलेल्या आक्षेपार्ह वक्तव्याविषयी केली दिलगिरी व्यक्त



दैनिक आपला विदर्भ

**बीड / प्रतिनिधी :** भाजपा आमदार सुरेश धस यांनी प्राजक्ता माळी यांच्या बाबत केलेल्या वक्तव्यावरून दिलगिरी व्यक्त केली आहे. सर्व स्तरातून टीकेचा भडीमार झाल्यानंतर अखेर सुरेश धस यांना याबाबत माफी मागावी लागली आहे. दोन दिवसांपूर्वी सरपंच देशमुख हत्या प्रकरणात माध्यमांशी साधलेल्या संवादावेळी प्राजक्ता माळी यांच्या बाबत धस यांनी वादग्रस्त विधान केले होते. आणि याच विधानावरून त्यांच्यावर सर्व स्तरातून टीकेची जोड उठली होती. यानंतर अखेर धस यांनी दिलगिरी व्यक्त केली आहे.

## नवीन वर्षाच्या पार्श्वभूमीवर नवी मुंबई पोलीस दल सज्ज; नियमांचे पालन करा अन्यथा होणार कडक कारवाई



दैनिक आपला विदर्भ

**नवी मुंबई / प्रतिनिधी :** नवीन वर्षाच्या पार्श्वभूमीवर नवी मुंबई पोलीस दल आता सज्ज झाला आहे. ठीक ठिकाणी नाकाबंदी करून नियमांचे भंग करणाऱ्या नागरिकांवर कडक कारवाईचे आदेश पोलीस उपायुक्त पंकज डहाणे यांनी दिलेले आहेत. त्यासोबत सुव्यवस्थेसाठी जवळपास ८०० हून अधिक पोलिसांचा बंदोबस्त यांना ठेवण्यात येणार आहे. तसेच नवीन वर्षाचे स्वागत करणारा ड्रंक अँड ड्राईव्ह टाळावं तसेच नियमांचे पालन करावे असा पोलीस उपायुक्त आवाहन पंकज डहाणे यांनी केलेला आहे.

## वर्षभरात पोलिसांमार्फत केलेल्या कारवाईची आकडेवारी सादर



दैनिक आपला विदर्भ


**छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी :** २०२४ या वर्षात छत्रपती संभाजीनगर शहर पोलीस यांना वेगवेगळ्या आवाहनांना सामोरे जावे लागले ज्या मधे लोकसभेच्या निवडणुका व विधान सभेच्या निवडणुका ह्या निवडणुका पोलिसांनी मात्र निर्विघ्न पार पडल्या तसेच शहरात नार्कोटेस्ट विभागाने देखील शहरात वेगवेगळ्या ठिकाणी कारवाई करण्यात आली. येणाऱ्या वर्षात गुन्हेगारी कमी करण्यासाठी वेगवेगळ्या उपाययोजना राबवू, छत्रपती संभाजीनगर शहरात येणाऱ्या नवीन वर्षात गुन्हेगारीचे प्रमाण कमी कारणासाठी पोलिस आयुक्त प्रवीण पवार हे वेगवेगळ्या उपाय योजना राबवणार आहे. तसेच आपल्या शहराला आता आणखी वाढीव पोलीस फ़ोर्स उपलब्ध करून देणार असल्याची माहिती त्यांनी पत्रकार परिषदेत बोलताना दिली आहे.

## ‘केरळ म्हणजे मिनी पाकिस्तान, सगळे दहशतवादी...’, राणेंचं वादग्रस्त विधान

**पुणे / प्रतिनिधी :** भाजपचे आमदार नितेश राणे अनेकदा वादग्रस्त वक्तव्य करत असतात. आपल्या वादग्रस्त वक्तव्यामुळे अनेकदा ते अडचणीतही सापडतात. मात्र पुन्हा एकदा नितेश राणे यांनी वादग्रस्त विधान केलं आहे. त्यांनी केरळ राज्याचा उल्लेख मिनी पाकिस्तान असा केला असून प्रियंका गांधी यांना दहशतवाद्यांनी मतदान केल्याचं नितेश राणेंनी म्हटलं आहे. राणेंच्या या विधानानंतर महाराष्ट्रासह केरळमध्ये नव्या वादाला तोंड फुटण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## खासदार रवींद्र वायकर यांच्या मोटरगाडीला अपघात





**मुंबई / प्रतिनिधी :** खासदार रवींद्र वायकर यांच्या मोटरगाडीला गोरेगाव परिसरात रविवारी रात्री अपघात झाला. वायकर यांचा चालक मोटरगाडी चालवत होता. अपघात किरकोळ स्वरूपाचा असून त्यात कोणीही जखमी झालेले नाही, असे पोलिसांनी सांगितले.

गोरेगाव पूर्व येथील राज्य राखीव पोलीस दलाच्या मैदानाच्या प्रवेशद्वाराजवळ रविवारी सायंकाळी ७.४५ च्या सुमारास हा अपघात झाल्याचे पोलिसांनी सांगितले. एक मोटारसायकलस्वार वायकर यांच्या मोटरगाडीच्या उजव्या बाजूने पुढे जाण्याचा प्रयत्न करीत होता. त्यावेळी मोटारसायकलची वायकर यांच्या गाडीला धडक बसणार होती. अपघात टाळण्यासाठी चालकाने मोटरगाडी बाजूला वळवली. त्यावेळी मोटरगाडी तेथील ट्रकला घासली. त्यामुळे वायकर यांच्या मोटरगाडीचे नुकसान झाले. मोटरगाडीच्या दरवाजाचे हँडल तुटले आहे. वायकर त्यावेळी मोटरगाडीतच होते, पण त्याना कोणतीही दुखापत झाली नसल्याचे सूत्रांनी सांगितले. याप्रकरणी वनराई पोलीस सीसीटीव्ही कॅमेऱ्यातील चित्रीकरण तपासत असून अद्याप कोणताही गुन्हा दाखल करण्यात आला नाही, असे पोलिसांनी सांगितले.

## नववर्षाच्या पूर्वसंध्येला भारतीयांना अप्रतिम वैज्ञानिक भेट

### इस्त्रोच्या ‘स्पॅडेक्स PSLV-C60’ यशस्वी मोहिमेचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून कौतुक

**मुंबई / प्रतिनिधी :** नववर्षाच्या पूर्वसंध्येला भारतीय अंतराळ संशोधन संस्थेने (इस्त्रो) भारतीयांना अप्रतिम वैज्ञानिक भेट दिली आहे, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भारताच्या ‘स्पॅडेक्स PSLV-C60’ या महत्वाकांक्षी मोहिमेच्या यशाचे कौतुक करत या संशोधन प्रकल्पात सहभागी इस्त्रोच्या वैज्ञानिक, अभियंते यांचे अभिनंदन केले आहे.

मुख्यमंत्री शुभेच्छा संदेशात म्हणतात, या मोहिमेमुळे भारताला अंतराळात दोन उपग्रहांच्या दरम्यान ‘डॉकिंग’ ‘अनडॉकिंग’ करण्याची क्षमता प्राप्त होणार आहे. अंतराळातील दोन उपग्रह किंवा उपकरणे जोडून नवीन रचना तयार करण्याच्या या क्षमतेतून भविष्यातील अनेक महत्त्वाचे संशोधन प्रकल्प राबविणे शक्य होणार आहे. यातून जगात अंतराळ संशोधनात अशी मजल गाठणारे भारत चौथे राष्ट्र ठरणार आहे, याचाही भारतीयांना सार्थ अभिमान आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकसित भारत संकल्पनेला बळ देणारी ही कामगिरी आहे. भारतीय अंतराळ संशोधनाचे अवकाश विस्तारणारी ही कामगिरी आहे. यामुळे भारताच्या अंतराळ संशोधनाच्या शिरपेचात ‘इस्त्रो’ने मानाचा तुरा रोवला आहे. या मोहिमेत सहभागी इस्त्रोचे वैज्ञानिक, अभियंते तसेच भारतीय अंतराळ विज्ञान विभागातील सर्वांचे मनापासून अभिनंदन आणि यापुढेही या मोहिमेत सुरू राहणाऱ्या विविध प्रयोग, संशोधन प्रकल्पांना हार्दिक शुभेच्छा, असेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी म्हटले आहे.



# राष्ट्रवादीत राजकीय हालचालींना वेग

## दादांचा आमदार शरद पवारांना का भेटला?

दैनिक आपला विदर्भ

**पुणे / प्रतिनिधी :** मागील काही दिवसांपासून राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन्ही गट एकत्र येतील अशा चर्चा सुरू आहेत. १२ डिसेंबरला शरद पवारांचा वाढदिवस होता. यादिवशी दिल्लीत अजित पवार, सुनील तटकरे आणि प्रफुल्ल पटेल अशा महत्त्वाच्या नेत्यांनी पवारांची घरी जाऊन भेट घेतली होती. ही भेट वाढदिवसांच्या शुभेच्छा देण्यासाठी असल्याचं स्पष्टीकरण अजित पवारांनी त्यावेळी दिले होते. मात्र या बैठकीनंतर राष्ट्रवादीचे दोन्ही गट एकत्र येतील, अशा चर्चा सुरू झाल्या होत्या. याबाबतचं सूचक वक्तव्य शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी केले होते. त्यांच्या मातोश्री सुनंदा पवार यांनी देखील अजित पवार आणि शरद पवारांनी एकत्र यावे असे भाष्य केले होते.

या सगळ्या घडामोडीनंतर आज सोमवारी सकाळी अजित पवार गटाचे आमदार चेतन तुपे यांनी पुण्यात शरद पवारांची भेट घेतली आहे. तुपे हे अजित पवारांच्या जवळचे नेते मानले जातात. अशा स्थितीत तुपे यांनी शरद पवारांची भेट घेतल्याने राजकीय चर्चांना उधाण आले होते. दोन्ही गट एकत्र येऊ शकतात, अशा चर्चा पुन्हा सुरू झाल्या. मात्र य सगळ्यावर आम दार चेतन तुपे यांना स्वत: प्रतिक्रिया दिली आहे.

दोन्ही गट एकत्र येण्याची चर्चा त्यांनी धुडकावून लावल्या आहेत. शिवाय आपण राजकीय कारणांसाठी शरद पवारांची भेट घेतली नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. आपण रयत शिक्षण संस्थेच्या कामानिमित्त भेट घेतली. यावर आमच्यात चर्चा झाली. बैठकीचा राजकीय हेतू नव्हता, असे स्पष्टीकरण तुपे यांनी दिले आहे.

प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना चेतन तुपे म्हणाले, रयत शिक्षण संस्थेच्या संदर्भात ज्या काही गोष्टी होत्या, त्याबाबत चर्चा करण्यासाठी





ही बैठक होती. पश्चिम विभागातील ज्या शाखा आहेत, त्याबद्दल चर्चा झाली. नवीन वर्ष सुरू होत आहे, त्यामुळे रयतने काही गोष्टी राबवायचे ठरवले आहे. शाळांच्या काही सुधारणा करायच्या आहेत. त्याबाबत सूचना शरद पवारांनी केल्या आहेत. माझे आणि शरद पवार यांचे कौटुंबीक संबंध आहेत, प्रत्येक गोष्ट राजकारणाशी जोडू नये. राजकारणाच्या पलीकडे जाऊन संबंध ठेवले पाहिजे, ही महाराष्ट्राची संस्कृती आहे. रयत संस्थेचे इतर काही लोकही शरद पवारांना आज भेटले आहेत.

## बाल विवाह समस्येचे उच्चाटन व्हावे

बाल विवाहावर कायदेशीर बंदी असतानाही आज बाल विवाह कमी होताना दिसत नाही. दररोजच्या वर्तमानपत्रात बाल विवाह झाल्याची एखादी तरी बातमी असतेच. महाराष्ट्रा सारख्या पुरोगामी आणि प्रगत राज्यातही बाल विवाहाचे प्रमाण लाक्षणिक आहे. महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्याला हे भूषणावह नाही. लॉक डाऊनमध्ये तर बालविवाहाचे प्रमाण खूप वाढले होते आता सर्व सुरळीत सुरू झाल्यानंतर तरी बाल विवाहाचे प्रमाण कमी होईल असे वाटले होते मात्र अजूनही राज्यात बाल विवाह होत आहेत. अर्थात इतर राज्यांच्या मानाने महाराष्ट्रातील बाल विवाहाचे प्रमाण कमी आहे ही समाधानाची बाब असली तरी बाल विवाह पूर्णतः रोखण्यात महाराष्ट्र अपयशी ठरला आहे हे मान्यच करावे लागेल. मागील वर्षी द लांसेट ग्लोब हेल्थ या शोध पत्रिकेत एक अहवाल प्रकाशित झाला. या अहवालात आपल्या देशातील बाल विवाहाचा सद्य स्थितीवर बोट ठेवण्यात आले आहे. या अहवालानुसार देशातील काही राज्ये तसेच केंद्र शासित प्रदेशांमध्ये २०१६ ते २०२१ या कालावधीत बाल विवाहाची कुप्रथा सामान्य बनली असल्याचा दावा केला आहे. बाल विवाहामुळे देशाच्या प्रगतीला खीळ बसल्याचेही या अहवालात म्हंटले आहे याचाच अर्थ देशात आजही बालविवाह होत आहेत. राज्यातही होत आहेत. राज्याच्या विविध विभागातून मिळालेल्या माहितीनुसार राज्यातील १६ आदिवासी बहुल जिल्ह्यांमध्ये मागील चार वर्षामध्ये अल्पवयीन मातांची संख्या १२, २५३ इतकी आढळून आली आहे. या आदिवासी जिल्ह्यांत १८ वर्षांपेक्षा कमी वय असलेल्या गर्भवती मातांची संख्या देखील लाक्षणिक आहे. बाल विवाहाची प्रथा काही आदिवासी जमातींमध्ये पिढ्यानपिढ्या सुरू आहे. हा परंपरेचा भाग असला तरी पुणे मुंबई सारख्या शहरात आणि राज्याच्या ग्रामीण भागातही बाल विवाहाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात आहे हे कोणालाही नाकारता येणार नाही. आपल्या देशात मुला मुलींच्या लग्नाचे वय कायद्याने ठरवून दिले आहे. मुलांचे लग्नाचे वय २१ तर मुलींच्या लग्नाचे वय १८ असावे असे कायदा सांगतो त्यापेक्षा कमी वयात विवाह झाला तर तो बाल विवाह समजला जातो. २००६ साली केंद्र सरकारने बाल विवाह प्रतिबंधक कायदा नव्याने मंजूर केला. मात्र सरकारने मंजूर केलेल्या कायद्यानुसार बाल विवाहास कठोर शिक्षेची तरतूद आहे. मात्र या कायद्याची योग्य अंमलबजावणी होत नसल्याने या कायद्याचा धाक राहिला नाही. बाल विवाह झालेल्या मुला मुलीला लहानपणीच संसाराचा गाढा हाकलावा लागतो त्यामुळे त्यांचे बालपण हिरावले जाते. शिक्षण अर्धवट राहते. बाल विवाह झालेल्या मुलींना अल्पवयातच मातृत्व प्राप्त होते. त्यामुळे जन्माला येणारे बाळ देखील सशक्त नसते. बाल वयातच आई झालेल्या मुलीला देखील आरोग्याच्या समस्या निर्माण होतात त्यामुळे कुपोषणासह अनेक रोगांना त्यांना सामोरे जावे लागते. आज आपला देश सर्वच क्षेत्रात प्रगती करीत आहे. इंटरनेट, मोबाईल, आधुनिक तंत्रज्ञान यामुळे आपण जगासोबत स्पर्धा करीत आहोत. अगदी चंद्रावर देखील आपण स्वारी केली आहे. जगातील प्रगत देशात आपली गणना होऊ लागली आहे. आधुनिक शिक्षण घेऊन आपण काळासोबत पुढे जात असताना खेड्यापाड्यातील मुली बाल विवाहाला बळी पडत आहेत. ही विसंगती बदलायला हवी. त्यासाठी बाल विवाह समस्येचे मुळापासून उच्चाटन व्हायला हवे. बाल विवाह या सामाजिक समस्येचे उच्चाटन करायचे असेल तर सर्वानाच जागृत करणे गरजेच आहे. भारतात बाल विवाहाचे प्रमाण कमी करण्यासाठी शासन, प्रशासन, सामाजिक संस्था, व समाजाने एकत्रित प्रयत्न करणे गरजेचे आहे. बाल विवाह रोखण्यासाठी ग्राम पातळीवरील समित्या सक्षम करण्याची गरज आहे. लग्नासाठी वयाचे दाखले या समितीकडे जमा करून त्या समितीची लेखी परवानगी घ्यावी असा नियम केला तर बाल विवाहास काही प्रमाणात आळा बसेल. बाल विवाह होऊ नये यासाठी विविध स्तरातून जनजागृती करावी. ज्याप्रमाणे अस्पृश्यता, सतीची चाल, विधवा विवाहास बंदी, केशवपन या अनिष्ट चालीचे उच्चाटन झाले त्याप्रमाणे बाल विवाहाचे देखील उच्चाटन व्हायला हवे.

# नववर्षाच्या पार्श्वभूमीवर राज्य उत्पादन शुल्क विभाग सक्रीय

## ३१ डिसेंबरला मद्य विक्री वेळेत शिथिलता

## अवैध मद्य विक्री, वाहतूक प्रकरणी तक्रार नोंदविण्याची आवाहन

दैनिक आपला विदर्भ




**बुलढाणा/प्रतिनिधी :** नववर्षाच्या आगमनाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील विविध भागात अवैध वाहतुक तसेच विक्री मोठ्या प्रमाणात होतात. अशा घटनाना प्रतिबंध घालण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागामार्फत दि. ३१ डिसेंबरपर्यंत विशेष मोहिम राबविण्यात येत आहे. तथापि कोणत्याही अनुज्ञप्तीमध्ये विना परवाना मद्यविक्री किंवा अल्पवयीन तरुणांना दारु उपलब्ध होत असल्यास अशावर राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून कडक कारवाई केली जाणार आहे. तसेच नागरिकांनादेखील काही तक्रारी असल्यास विभागाशी संपर्क करावा, असे आवाहन राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक डॉ. पराग मो.नवलकर यांनी केले आहे.

राज्य शासनाच्या गृह विभागाने नववर्षानिमित्त जिल्ह्यातील मद्यविक्री अनुज्ञप्त्या त्यांच्या निर्धारीत वेळेपेक्षा अधिक कालावधीसाठी उघड्या ठेवण्याबाबत परवानगी दिली आहे. त्यानुसार एफएल-२,एफएल-४,एफएल, बीआर-२ व सीएल-३ या अनुज्ञप्त्या त्यांच्या निर्धारित वेळेपेक्षा अधिक कालावधीसाठी म्हणजेच दि. ३१ डिसेंबर २०२४ पासुन एफएल-२, एफएल व बीआर-२ अनुज्ञप्तीला दुसऱ्या दिवशी सकाळी १ वाजेपर्यंत तर एफएल-३ अनुज्ञप्तीला दुसऱ्या दिवशी सकाळी ५ वाजेपर्यंत अनुज्ञप्त्या उघड्या ठेवण्यासाठी परवानगी देण्यात आलेली आहे. तसेच कोणत्याही अनुज्ञप्तीमध्ये विना परवाना मद्यविक्री होऊ नये यासाठी संबंधित निरीक्षक, दुय्यम निरीक्षण यांच्यामार्फत संपूर्ण जिल्ह्यातील अनुज्ञप्तीधारकांना एकुण ६० हजार विदेशी एक दिवसीय मद्यसेवन परवाने वितरीत करण्यात आलेले आहे. कोणत्याही अनुज्ञप्ती विना परवाना मद्यविक्री चालु असल्याचे आढळल्यास तसेच अल्पवयीन तरुणांना दारु उपलब्ध होत असल्याची माहिती राज्य उत्पादन शुल्क विभागाला द्यावी.

नाताळ व नववर्ष आगमनाच्या अनुषंगाने राज्य उत्पादन शुल्क बुलढाणा कार्यालयाच्यावतीने अवैध मद्य निर्मिती, वाहतुक व विक्री वर प्रतिबंध घालण्यासाठी बुलढाणा जिल्ह्यातील कार्यक्षेत्रीय अधिकारी निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, बुलढाणा, राज्य उत्पादन शुल्क देऊळगाव राजा व राज्य उत्पादन शुल्क खामगाव व राज्य उत्पादन शुल्क, भरारी पथक यांच्याकडून जिल्ह्यातील विविध हातभट्टी ठिकाण, अवैध मद्यविक्री केंद्रावर छापे टाकुन कारवाई करणे चालु आहे. तसेच नववर्षाच्या अनुषंगाने आयोजित करण्यात येणाऱ्या पार्ट्या, हॉटेल्समध्ये होणारी मद्यविक्री यावर राज्य उत्पादन शुल्क विभागाची करडी नजर असणार आहे.

**गेल्या नऊ महिण्यात २ कोटी ४३ लक्ष रुपयांचा मुद्देमाल जप्त**

राज्य उत्पादन शुल्क विभागाने अवैध विक्री, मद्यनिर्मीती व वाहतुक प्रकरणी दि. १ मार्च २०२४ पासून ते आजपर्यंत विशेष मोहिम राबवून २ कोटी ४३ लक्ष ५२ हजार ५७९ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आले आहेत. यामध्ये १ हजार २५६ व्यक्तीवर गुन्हे दाखल करण्यात आले असून ११४ वाहन जप्त करण्यात आले आहे, अशी माहिती राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक डॉ. पराग मो. नवलकर यांनी दिली आहे. सदर कारवाई राज्य उत्पादन शुल्क आयुक्त विजय सूर्यवंशी, संचालक प्रसाद सुर्वे साहेब व विभागीय उप-आयुक्त अर्जुन ओहोळ यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आलेली आहे.

शासनाच्या नियमानुसार दारु पिण्यासाठी मद्यसेवन परवाना असणे आवश्यक आहे. बुलढाणा जिल्ह्यातील परमीट रुम, बीअरबार, वाईन शॉप, देशी दारु दुकानचालक यांना त्याबद्दल सक्त सुचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच मद्यसेवन परवाना नसल्यास व्यक्तीला व अल्पवयीन तरुणांना मद्यविक्री केल्यास अनुज्ञप्तीधारकांवार कारवाई केली जाईल, असा इशारा देण्यात आला आहे. अवैध मद्यविक्री करणाऱ्या हॉटेल्स, ढाब्याबाबत, अवैध मद्यनिर्मीती वाहतुकीबाबत माहीती देण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागाकडील टोल फ्री नंबर १८००२३३९९९९ किंवा व्हॉटसअॅप नंबर ८४२२००११३३ वर किंवा excisesuvidha.mahaonline.gov.in या विभागाचे पोर्टलवर तात्काळ माहिती द्यावी.

## 'मुलगी झाली हो' फेम अभिनेता सिद्धार्थ खिरीडने दिली प्रेमाची कबुली, मिठीतील 'ती' मिस्ट्री गर्ल कोण?

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** मुलगी झाली हो, फ्रेशर्स सारख्या मराठी मालिकांमधून प्रेक्षकांच्या भेटीला आलेला अभिनेता सिद्धार्थ खिरीडने सरत्या वर्षात चाहत्यांना आनंदाची बातमी दिली आहे. सिद्धार्थने त्याच्या प्रेमाची कबुली दिली आहे. सिद्धार्थने होणाऱ्या बायकोला प्रपोज केलं असून दोघांचे फोटो शेअर केलेत. पण त्याची होणारी बायको कोण आहे हे अद्याप समोर आलेलं नाही. सिद्धार्थने प्रेमाची कबुली दिल्यानंतर त्याची बायको नेमकी कोण आहे हे जाणून घेण्यासाठी चाहते उत्सुक आहेत.



अभिनेता सिद्धार्थ खिरीड रिलेशनशिपमध्ये असल्याच्या चर्चा अनेक दिवसांपासून सुरू होत्या. त्याच्याबरोबर काम करणाऱ्या अनेक अभिनेत्रींबरोबर त्याचं नाव जोडण्यात आलं होतं. अखेर सिद्धार्थने त्याच्या प्रेमाची कबुली दिली पण त्याच्या मिस्ट्री गर्लचा चेहरा काही चाहत्यांना दाखवला नाही.

सिद्धार्थने त्याचे फोटो शेअर केलेत. ज्यात त्याची होणार बायको त्याला मिठी मारताना दिसत आहे. दोघांच्या मागे फुलांच्या हार्टचं डेकोरेशन करण्यात आलं आहे. समोर समुद्र दिसत आहे. सिद्धार्थने ब्लॅक कलरचा सुट वेअर केला आहे. तर त्याच्या मिस्ट्री गर्लने ब्लू कलरचा वन पिस वेअर केला आहे. मिस्ट्री गर्लने सिद्धार्थला मिठी मारली आहे. फोटोमध्ये फक्त सिद्धार्थचं चैहरा दिसतोय.

रोमँटिक फोटो शेअर करत सिद्धार्थने लिहिलंय, नुसते २०२४ वर्ष संपत नाहीये तर माझ्या आयुष्यातील 'सिंगल' असण्याचा चाप्टरही संपतोय. सिद्धार्थने शेअर केलेल्या पोस्टनंतर मराठी इंडस्ट्रीतील अनेक कलाकारांनी त्याचं अभिनंदन केलं आहे. त्याला शुभेच्छा दिल्या आहेत.

अभिनेत्री योगिता चव्हाण, चेतना भट, ओंकार राऊत,गौरी नलावडे, अमृता देशमुख, मिताली मयेकर, रश्मी अनपट अशा अनेक कलाकारांनी सिद्धार्थचं अभिनंदन केलं आहे.

## भोंदूकडून महिलेवर बलात्कार, बिबवेवाडी पोलिसांकडून गुन्हा दाखल

**पुणे/प्रतिनिधी :** दैवीशक्ती प्राप्त झाल्याची बतावणी करुन एका भोंदूने महिलेवर चाकुच्या धाकाने बलात्कार केल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी बिबवेवाडी पोलिसांनी भोंदूविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. याबाबत एका महिलेने बिबवेवाडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तिने दिलेल्या फिर्यादीनुसार, आरोपीविरुद्ध बलात्कार, तसेच जिवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी आणि महिलेची ओळख होती. दैवीशक्ती अवगत आहे, तसेच माझ्या अंगात संचार होतो, असे सांगून भोंदूने महिलेला जाळ्यात ओढले. त्यानंतर आरोपी महिलेच्या घरी आला. महिला आणि तिची दोन मुले घरात होते. भोंदूने महिलेला चाकूचा धाक दाखवून तिच्यावर बलात्कार केल्याची घटना नुकतीच घडली. घाबरलेल्या महिलेने पोलिसांकडे तक्रार दिली. सहायक पोलीस निरीक्षक सावंत तपास करत आहेत.









## पोलिसांना सरेंडर व्हावे की नाही यावरुन वाल्मीक कराड आणि त्यांच्या 'आका'मध्ये वाद: सुरेश धस

**बीड/प्रतिनिधी :** मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणात दररोज नवनवे गौप्यस्फोट करणारे भाजप आमदार सुरेश धस यांनी सोमवारी पुन्हा एकदा नव्या आरोपांची राळ उडवून दिली. संतोष देशमुख यांच्या हत्येमागील सूत्रधार असल्याचा ठपका असणारे वाल्मीक कराड आणि त्यांच्या 'आका'मध्ये सध्या द्वंद्व सुरु आहे. पोलिसांसमोर हजर व्हायचे की नाही यावरुन दोघांमध्ये वाद सुरु असल्याचा दावा सुरेश धस यांनी केला. सुरेश धस यांनी सोमवारी बीडच्या जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेतली. यानंतर त्यांनी प्रसारम ाध्यमांशी संवाद साधला.

वाल्मीक कराड यांना सीआयडीच्या पथकाने रविवारी रात्रीच अटक केली आहे, अशी चर्चा आज सकाळपासून होती. याबाबत विचारले असता वाल्मीक कराड यांनी म्हटले की, 'आका' आतमध्ये गेले आहेत की नाही, हे मी आता सांगणार नाही. मला सीआयडीच्या अधिकाऱ्यांकडून कोणतीही माहिती मिळाल्याशिवाय मी याबाबत काहीच बोलणार नाही. संतोष देशमुख हत्याप्रकरणाच्या तपासावर मी समाधानी आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी सर्व यंत्रणा १५०-२००च्या स्पीडने कामाला लावल्या आहेत. ते म्हणतात ना, ' बकरे की माँ कब तक दुवा माँगेगी'. या प्रकरणातही दुवा फारकाळ चालणार नाही, दुवा अर्ध्यातच सुटणार आहे, असे सुरेश धस यांनी म्हटले.






DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# आमदार खरात यांच्या संकल्पनेतून जानेफळ येथे एक सुर एक ताल कार्यक्रमाचे आयोजन

दैनिक आपला विदर्भ



**मेहकर/प्रतिनिधी :** लोणार मतदार संघातील नवनिर्वाचित आमदार सिद्धार्थ रामभाऊ खरात हे निवडून आल्या पासून त्यांनी विविध कामाचा झपाटा लावला असून विविध उपक्रम हाती घेतले आहे विशेष म्हणजे तरुण युवकांना रोजगार उपलब्ध व्हावा त्यांना योग्य मार्गदर्शन मिळावे म्हणून युवक बिरादरी संस्थेला ५०वर्ष पूर्ण झाल्या बद्दल आमदार सिद्धार्थ खरात यांच्या संकल्पनेतून उत्कर्ष फाउंडेशन सिंदखेड राजा व युवक बिरादरी भारत यांच्या संयुक्त विद्यमाने आज दि.३१ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता श्री सरस्वती विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय जानेफळ येथे युवक बिरादरी भारत अंतर्गत एक सुर एक ताल कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाअंतर्गत तरुण युवकांना औद्योगिक कौशल्य विकास,व्यक्तिमत्व विकास, आत्मविश्र्वास या बाबतीत योग्य मार्गदर्शन मिळणार आहे. युवक बिरादरी प्रकल्प हा

## उत्कर्ष फाउंडेशन कडून आयोजन: युवकांना मिळणार नवी दिशा




संस्थापक अध्यक्ष पद्मश्री क्रांतीशाहा, अध्यक्ष अभिषेक बच्चन, उपाध्यक्ष रितेश देशमुख यांच्या मार्फत जगभरात कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते आमदार सिद्धार्थ खरात यांनी मेहकर तालुक्यातील युवकांना फायदा व्हावा म्हणून पहिल्यांदाच आगळे वेगळे आयोजन केले आहे, एक सुर एक ताल.. या अभियानाचे प्रशिक्षक.. प्राध्यापक.. अतुल सुंदरकर.. (आंतरराष्ट्रीय गायक.. आणि प्रशिक्षक.२०१४ चा उत्तर प्रदेश शासन शिक्षण विभागाकडून गौरव पुरस्करिनी. २०२४ व्हिएतनाम देशात. हँग बँग इंटरनॅशनल युनिव्हर्सिटी तर्फे पुरस्कार.. नुकताच मिळाला. कृष्णा रत्नपारखी (तबला वादक ) प्रवीण पवार (विविध तरंगिनी वादक) अक्षय जाधव..( नृत्य दिग्दर्शक) पंकज उनोने(साऊंड इंजिनियर) अंकुश मालवे,बाळूभाऊ पाखरे, पत्रकार गणेश सवडतकर मुख्याध्यापक प्रा डॉ रामदास धामोडकर,उपमुख्याध्यापक गजानन जाधव, पर्यवेक्षक डॉक्टर शिवाजी म्हस्के, विज्ञान शिक्षक डॉ. बाहेकर,श्री पाटील, श्री शिंदे,श्री पेटकर,श्री काळे पत्रकार अंकुश वानखेडे श्रीकृष्ण काकडे आदींची उपस्थिती राहणार आहेत तर जास्तीत जास्त युवकांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन मुख्य संयोजक पुरुषोत्तम बोर्डे यांनी केले आहे.

## महत्त्वाचे...

### ऊसाला एफआरपी नुसार दर द्या,शेतकऱ्यांची मागणी



दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी :** ऊसाला एफआरपी नुसार दर द्या अशी मागणी शेतकऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे. यासाठी या शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी यांना एक निवेदन देखील दिल आहे.

यंदा केंद्र सरकारने ३ हजार ४०० रुपये अग्रीम रक्कम निश्र्चित केली आहे. मात्र गाळप सुरू होऊन दीड महिना उलटला तरीही अजून कोणत्याही शेतकऱ्याला साखर कारखाण्याकडून बिले मिळालेली नाहीत. साखर कारखान्याची ऊस खरेदी करतानाची नियमावली निश्र्चित करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात एक बैठक घेण्यात यावी. फळ उत्पादक शेतकऱ्यांना २०२३ चा पीकविमा देण्यात यावा अशीही मागणी या शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे केली आहे.

### तपासा संदर्भामध्ये सीआयडीच्या अधिकाऱ्याची भेट घेतली - धनंजय देशमुख



दैनिक आपला विदर्भ

**बीड/प्रतिनिधी :** तपासा संदर्भामध्ये संतोष देशमुख यांचे भाऊ धनंजय देशमुख यांनी शहर पोलीस ठाण्यामध्ये सीआयडीच्या तपास अधिकारी यांची भेट घेतली. तपासा संदर्भात माहिती विचारल्यावर त्यांनी उद्या सर्व माहिती देणार असल्याचे सांगितले त्याचबरोबर दोन दिवसात सर्व फरार आरोपी अटक करणार असल्याचेही सीआयडीच्या अधिकाऱ्यांनी सांगितल्याच धनंजय देशमुख यांनी म्हणाले धनंजय देशमुख ज्यावेळेस पोलीस ठाण्यात होते त्याच वेळेस वाल्मिक कराड यांची दुसरी पत्नी ज्योती जाधव देखील असल्याचे धनंजय देशमुख यांनी सांगितले.

# वाचन संकल्प महाराष्ट्राचा संस्कार सौरभ वाचनालय ढाणकी येथे आयोजन

दैनिक आपला विदर्भ



**उमरखेड/प्रतिनिधी :** वाचन संस्कृतीच्या विकासाने तरुणांच्या व्यक्तिमत्त्वाचे भरण पोषण होण्यास तसेच सामाजिक प्रबोधन होण्यास मदत होते. परंतु सध्या तरुण वाचन संस्कृती पासून दुरावत असून मोबाईलच्या आहारी जात आहेत. यामुळे वाचनाकडे तरुणांची रुची कमी होत आहे.

या तरुण पिढीला ग्रंथाकडे आकर्षित करण्यासाठी उच्च शिक्षण व तंत्र शिक्षण महाराष्ट्र राज्य यांच्या अधिपत्याखाली शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयात दिनांक १ जानेवारी ते १५ जानेवारी या कालावधीत वाचन संकल्प महाराष्ट्राचा हा उपक्रम राबविण्याबाबत निर्णय झाला आहे.

सदर उपक्रमांतर्गत स्वच्छता सामूहिक वाचन,वाचन संवाद, वाचन कौशल्य,पुस्तक परीक्षण व कथन स्पर्धा यासारखे उपक्रम राबविण्यासाठी ची माहिती शासनाकडून आली असल्याने, ढाणकी संस्कार सौरभ सार्वजनिक वाचनालयाचे अध्यक्ष डॉक्टर लक्ष्मीकांत रावते साहेब यांनी वरील उपक्रम साजरे करण्याचे आवाहन सर्व वाचनाल्याचे पदाधिकारी,स्पर्धा वाचक विद्यार्थी व परिसरातील शाळेतील मुख्याध्यापक यांना केले आहे.

वाचनालयाच्या परिसरात दिनांक २९ डिसेंबर ला परिसर स्वच्छता करून उपक्रम सुरू करण्यात आले आहे . दिनांक ३० डिसेंबर ते ३१ डिसेंबर ला ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले असून,वाचन कौशल्य, वाचन संवाद या उपक्रमाचे नियोजन देखील केले आहे या उपक्रमाचा लाभ परिसरातील विद्यार्थी मुले ,मुली ,वाचक ,स्पर्धे तील विद्यार्थी, यांनी घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

## वाहन धारकांनी वज्ञ्झ नंबर प्लेट वाहन वितरकांकडून बसवून घेण्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार राज्य शासनाने दिनांक १ एप्रिल २०१९ पासून नवीन उत्पादीत होणाऱ्या वाहनांना HSRP नंबर प्लेट बसविण्याबाबत निर्देश जारी करण्यात आले आहे. त्यानुसार दि. १ एप्रिल २०१९ नंतर उत्पादित होणाऱ्या वाहनांना HSRP नंबर प्लेट बसविणे बंधनकारक असून वाहन वितरकांद्वारे ही नंबर प्लेट बसविण्यात येणार आहे. तरी सर्व वाहनधारकांनी HSRP नंबर प्लेट वाहन वितरकांकडून बसवून घ्यावी, असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी ज्ञानेश्वर हिरडे यांनी केले आहे. वाहनाचे नंबर प्लेटमध्ये छेडछाड व बनावटगिरी करुन होणारे गुन्हे कमी करणे, रस्त्यावर धावणाऱ्या वाहनांची ओळख पटविणे तसेच राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीकोनातून सर्व वाहनांना HSRP बसविण्याचे शासनाने निर्देश दिले आहे. त्यानुसार उप प्रादेशिक परिवहन कार्यालय बुलढाणा करीता झोन ३ मध्ये M/s FTA HSRP Solution Ptv Ltd. ही एजन्सी असून HSRP बुकींग पोर्टल लिंक http://maharashtrahsrp.com हा आहे. या करिता नेमण्यात आलेल्या पुरवठाराची यादी उप प्रादेशिक परिवहन कर्यालयाच्या सुचनाफलकांवर लावण्यात आली आहे. सर्व वाहनधारकांना याव्दारे सुचित करण्यात येते की, दि. १ एप्रिल २०१९ पुर्वी नोंदणी झालेल्या वाहनांनी HSRP बसविण्याची कार्यवाही त्वरीत करावी. याकरीता ऑनलाईन अर्ज करण्याची सुविधा वरील लिंकवर देण्यात आली असून अर्जाचे शुल्क भरणा ऑनलाईन करावा, असे प्रसिद्धी पत्रकाव्दारे कळविण्यात आले आहे.

# अंजली दमानिया बीड जिल्हाधिकाऱ्यांच्या भेटीला, वाल्मिक कराडशी संबंधित गणेश खडी क्रशरची मागवली माहिती, अजितदादांच्या नेत्याने डिवचले

दैनिक आपला विदर्भ

**बीड/प्रतिनिधी :** बीड येथील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांचे हत्या प्रकरण चांगलेच चर्चेत आले आहेत. या प्रकरणात मंत्री धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय असलेले वाल्मिक कराड हे मास्टरमाइंड असल्याचा आरोप केला जात आहे. सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी या प्रकरणात अनेक धक्कादायक दावे केले आहेत. तर बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर चार वेगवेगळी आंदोलने सुरु आहेत. आज वाल्मिक कराड यांच्यावरील खोटे गुन्हे मागे घ्या, यासाठी एका महिलेने आंदोलन सुरू केले आहे. तर तीन दिवसापासून सरपंच संतोष देशमुख यांना न्याय देण्यासाठी उपोषण केले जात आहे. तिसरे आंदोलन शहरातील शस्त्र परवाने तपासून रद्द करण्यासाठी आणि अंजली दमानिया यांचेही सत्य शोधक आंदोलन सुरु आहे. त्यातच अंजली दमानिया यांनी बीडचे जिल्हाधिकारी आणि राज्य उत्पादन शुल्क अधीक्षकांची भेट घेतली आहे. तर दुसरीकडे राष्ट्रवादी अजित पवार गटाचे प्रवक्ते सुरज चव्हाण यांनी अंजली दमानिया यांच्यावर निशाणा साधलाय. सामाजिक कार्यकर्त्यां अंजली दमानिया यांनी बीडचे जिल्हाधिकारी आणि राज्य उत्पादन शुल्क अधीक्षकांची भेट घेतली आहे. वाल्मिक कराड यांच्याशी संबंधित असलेल्या गणेश खडी क्रशर संदर्भात, तसेच बीडमध्ये एकूण किती दारूचे बार संदर्भात अंजली दमानिया यांनी माहिती मागितली आहे. याशिवाय काही गुंड त्रास देत असल्याच्या तक्रारी लोकांनी केल्या होत्या, त्या संदर्भात आम्ही जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेतल्याची माहिती त्यांनी दिली आहे.

# श्री गजानन महाराजांची पालखी बिबी नगरीतुन संत नगरीकडे प्रस्थान



दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**बिबी :** बीबी येथील संत गजानन महाराज संस्थानच्या वतीने 'गण गण गणात बोते'च्या गजरात संतनगरी शेगाव येथे 'श्रीं'ची पालखी मार्गस्थ झाली. या पायदळ दिंडीचे हे अकरावे वर्ष आहे. परिसरातील भाविकांच्या सहकार्यातून दिंडीचे आयोजन करण्यात येते. ३०डिसेंबर रोजी बीबीनगरीतून 'श्रीं'च्या पालखीचे सकाळी ९ वाजता प्रस्थान झाले. पालखीचे रथपूजन संस्थान विश्र्वस्त साहेबराव बाबा काटे व सारंगधर महाराज टेके ठाणेदार साहेब व पोलीस कर्मचारी बिबी सरपंच दिपक गुलमोहर, दिलीप बनकर, व गोविंद टेके चंद्रशेखर बनकर विष्णू जोरावर कैलास काकड बीबी परिसरातील पत्रकार ,रमेश खंडागळे भागवत आटोळे राजकीय सामाजिक कृषी क्षेत्रातील भाविकांच्या हस्ते पूजन करण्यात आले. फराळाची व्यवस्था दिनकर अच्युतराव आटोळे यांनी केली. मांडवा येथे पालखीचे स्वागत अशोक बुरकुल यांनी केले ६ जानेवारी २०२४ रोजी पालखी सोहळ्याची सांगता होईल. गोपाल महाराज टेके, रमेश कुरंगळ, , विक्रम शेरे, विजय महाराज गव्हाणे, संदीप काकड, मनोहर अवचार गोटू अवगळे वैभव आंधळे, संजय टेके, , पांडुरंग मिसाळ सहभागी झाले आहेत.




## विविध वृत्त...

### सारंगखेडाच्या अश्व बाजारात १५ दिवसात ४ कोटींची उलाढाल



दैनिक आपला विदर्भ

**नंदुरबार/प्रतिनिधी :** नंदुरबार जिल्हातील सारंगखेडाची यात्रा अश्र्व बाजारासाठी संपूर्ण भारतात प्रसिद्ध आहे.अश्र्व खरेदी करण्यासाठी व अश्र्व प्रदर्शन पाहण्यासाठी महाराष्ट्र नव्हे तर संपूर्ण भारतातून नागरिक येथे येतात. दत्त जयंती पासून या यात्रेला सुरुवात होते तर तेथून १५ दिवस ही यात्रा चालते .यात्रा सुरु होण्यापूर्वीच येथे अश्र्व दाखल होत असतात .चेतक फेस्टिवल च्या माध्यमातून अश्र्वाच्या विविध स्पर्धा येथे पार पडतात. उंच प्रजातीचे व देखणे अश्र्व येथे पाहायला मिळतात.आज ह्या यात्रेचा शेवटचा दिवस असून आता पर्यंत ८५० घोडे यात्रेत विक्री झाले आहेत. जवळपास ४ कोटींची उलाढाल सारंगखेडा यात्रेत अश्र्व विक्रीतून झाली आहे .तसेच सर्वात जास्त किंमत असलेला घोडा ३० लाखाला विकला गेला. दर वर्षी पेक्षा यावर्षी अश्र्व बाजारात चांगलीच तेजी दिसून आली व चांगला प्रतिसाद अश्र्व प्रेमी कडून मिळाला.एकंदरीत यंदाचा सारंगखेडा तील अश्र्व बाजारात चांगली उलाढाल झाली असून ४ कोटींचा टप्पा अश्र्व बाजाराने पार पाडला आहे.

### मस्साजोग सरपंच हत्या प्रकरणी बुलढाण्यातील सिंदखेडराजा मध्ये मोर्चा




दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :**बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची हत्या करणाऱ्या आरोपींना तात्काळ पकडा. हा खटला फास्टट्रॅक कोर्टात चालवा... अशा मागण्या घेऊन आज बुलढाण्यातील सिंदखेड राजा येथे मराठा समाज बांधवांकडून राजमाता जिजाऊ यांचे जन्मस्थान राजवाडा ते तहसील कार्यालय असा मोठा मोर्चा काढण्यात आला. राजवाड्यासमोर झालेला सभेत संतोष देशमुख यांच्या कन्या व त्यांच्या परिवारातील सदस्यांनी आम्हाला न्याय देण्यासाठी समाजाने आमच्या पाठीशी उभे राहावे. अशी कळकळीची विनंती उपस्थितांना केली. यावेळी माजी मंत्री डॉ. राजेंद्र शिंगणे व समाजातील अनेक प्रतिष्ठीतांनी संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना शिक्षा झालीच पाहिजे. अशी मागणी केली त्यानंतर राजवाडा ते तहसील कार्यालय असा मोर्चा निघाला व त्यानंतर तहसीलदारांना निवेदन देऊन मोर्चाची सांगता झाली.

### दुधाला अनुदान मिळाले; बळीराजाचे घर आनंदाने न्हाले!

**वाडा:** राज्यातील दूध उत्पादक शेतकऱ्यांचे आर्थिक हित जोपासण्यासाठी दूध खरेदी दराच्या चढ–उतारामुळे शेतकऱ्यांचे हाल होत होते. त्यामुळे सहकारी दूध संघ, खाजगी प्रकल्पांना दूध पुरवठा करणाऱ्या दूध उत्पादक शेतकऱ्यांना गाईच्या दुधासाठी आधी प्रति लिटर पाच रुपये तर नंतरच्या कालावधीत सात रुपयांचे अनुदान देण्याची योजना पशुसंवर्धन व दुग्ध विकास विभागामार्फत राबविण्यात येत आहे. या अनुदानाचा लाभ तिमाही टप्प्यात मिळत असून शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. खाजगी दूध प्रकल्पांना ३.५ फॅक्ट८ पॉईंट पाच एस एन एफ गुणम ानाच्या दुधासाठी १ आक्टोंबर २०२४ पासून प्रति लिटर २८ रुपये दर निश्चित केला आहे. राज्यातील सहकारी दूध संघ आणि खाजगी दूध प्रकल्पांना दूध पुरवठा करणाऱ्या शेतकऱ्यांना शासनामार्फत सात रुपये प्रति लिटर अनुदान थेट बँक खात्यात जमा केले जात आहेत.

# सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी भाविक संत गजानन महाराजांच्या चरणी लीन








दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** बुलढाणा जिल्ह्यातील संत गजानन महाराजांच्या मंदिर परिसरामध्ये भाविकांनी एकच गर्दी केल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. सलग नाताळच्या सुट्ट्या, सरत्या वर्षाचा निरोप आणि नवीन वर्षाची सुरुवात करण्यासाठी मोठ्या संख्येने राज्यभरातून भावीक शेगाव मध्ये दाखल झाले आहेत. आज सकाळपासून गजानन महाराजांच्या मंदिरात भाविकांची मोठी मांदियाळी झाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. भाविकांची गर्दी लक्षात घेता भाविकांची कुठलीच गैरसोय होऊ नये म्हणून मंदिर प्रशासनाकडून देखील विशेष अशी खबरदारी घेतली जात आहे.

दरवर्षी देशभरातील लाखो भाविक सरत्या वर्षाला निरोप देत गजानन महाराजांच्या समाधीचे दर्शन घेऊन नवीन वर्षाला सुरुवात करत असतात. त्यामुळे आज ३० डिसेंबर आणि ३१ डिसेंबर रोजी लाखोच्या संख्येने भाविक शेगाव येथे दाखल होतात. तशी गर्दी आता शहरात होऊ लागली आहे. नवर्षाच्या निमित्ताने शहरात पालख्याही दाखल होताना दिसून येत आहे.

नाताळाची सुट्टी, सरत्या वर्षाला निरोप व नवीन वर्षाच्या स्वागता निमित्त शेगावात श्रींच्या दर्शनासाठी होणारी संभाव्य गर्दी लक्षात घेता, श्री संत गजानन महाराजांच्या समाधीचे मंदिर ३१ डिसेंबर रोजी दर्शनासाठी रात्रभर खुले ठेवणार येणार आहे, अशी माहिती श्री गजानन महाराज संस्थानच्या वतीने देण्यात आली आहे. दरवर्षी नाताळच्या सुट्ट्या, चालू वर्षाला निरोप व नवीन वर्षाचे स्वागत करण्याच्या निमित्ताने श्रींच्या दर्शनासाठी शेगावात मोठ्या प्रमाणात भाविक येत असतात. भाविकांना श्रींच्या समाधी दर्शनाचा लाभ मिळावा व होणाऱ्या गर्दीचे नियोजन योग्य रितीने व्हावे, या उद्देशाने ३१ डिसेंबर रोजी श्रींचे समाधी मंदिर दर्शनासाठी रात्रभर खुले ठेवण्यात येणार आहे.

## टिपरच्या धडकेत शाळकरी विद्यार्थी ठार

दैनिक आपला विदर्भ



**उमरखेड/प्रतिनिधी :** कॉलेज करून घराकडे जात असलेल्या विद्यार्थीच्या दुचाकीला पाठीमागून येणाऱ्या टिपरने धडक दिल्याने जागेवरच ठार झाल्याची घटना सोमवार ३० रोजी दुपारी १ .४५ वाजता दरम्यान बाळदी रोड वरील औद्योगिक प्रशिक्षण केंद्राजवळ घडली.

अपघातात मृत्यू झालेल्या मूर्तकाचे नाव अजित गजानन राठोड (१९) रा कृष्णापुर तांडा ता उमरखेड असे असून आपल्या दुचाकी वाहन क्रमांक MH 29 CG 3519 ने दुपारी कॉलेजवरून घराकडे जात असताना मागून येणाऱ्या टिप्परने जोरदार धडक दिल्याने बाळदी रोडवरील औद्योगिक प्रशिक्षण केंद्रा जवळ अजित यांचे जागीच मृत्यू झाल.

अजित राठोड हा गोपिकाबाई सिताराम गावंडे महाविद्यालयात इयत्ता अकरावी मध्ये शिकत होता.सदर अपघाताचे फिर्याद मृतकाचे वडील गजानन गोकुळ राठोड (४०) यांनी पोलीस स्टेशन फिर्याद दिली असून वाहन चालकांवर पोलिसांनी गुन्हे दाखल केले आहे.

सदर अपघातामुळे संपूर्ण गावावर शोककळा पसरली आहे.

## जिल्हा पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी रणजीतसिंग राजपूत तर सरचिटणीसपदी कासिम शेख

### पत्रकार भावना समोर आतिषबाजी



दैनिक आपला विदर्भ



रणजीतसिंग राजपूत



कासिम शेख

**बुलढाणा/प्रतिनिधी :** बुलढाणा जिल्हा पत्रकार संघाच्या जिल्हाध्यक्ष पदी रणजीतसिंग राजपूत यांची निवड झाली आहे. बुलढाणा येथे पत्रकार भवन येथे आज २९ डिसेंबर रोजी दुपारी १ वाजेच्या सुमारास मराठी पत्रकार परिषदेची जिल्हास्तरीय बैठक आयोजित करण्यात आली होती.या बैठकीत मराठी पत्रकार परिषदेच्या राज्य उपाध्यक्ष पदी चंद्रकांत बर्दे यांची नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.त्यानंतर जिल्हाध्यक्ष पदाचा प्रस्ताव मांडण्यात आला. यावेळी सूचक म्हणून गजानन राऊत यांनी जिल्हाध्यक्ष पदासाठी रणजीतसिंग राजपूत यांचे नाव सुचवले. तेव्हा सर्वांनी एकमताने त्यांच्या नावाला पाठिंबा दर्शविला.

मराठी पत्रकार परिषद संलग्नित बुलढाणा जिल्हा पत्रकार संघाच्या जिल्हाध्यक्ष पदी रणजीतसिंग राजपूत, सरचिटणीस कासिम शेख, कार्याध्यक्ष प्रशांत देशमुख, वसिम शेख, चिटणीस यशवंत पिंगळे, महिला जिल्हाध्यक्ष कु.मृणाल सोमनाथ सावळे, सोशल मिडीया जिल्हा प्रमुख संजय जाधव, उपाध्यक्ष संतोष लोखंडे यांची अविरोध निवड करण्यात आली आहे.

यावेळी अधिस्विकृतीधारक पत्रकार समितीचे विभागीय सदस्य राजेंद्र काळे, मराठी पत्रकार परिषदेचे उपाध्यक्ष चंद्रकांत बर्दे, डिजीटल मिडीया परिषदचे राज्य उपाध्यक्ष अनिल उंबरकर यांची प्रमुख उपस्थिती होती. या बैठकीत बुलढाणा जिल्ह्यातील पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.पत्रकार भावना समोर आतिषबाजी करून नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा शाल पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

## चोरीचा उलगडा करण्यासाठी मध्यप्रदेशातील जंगल घातले पालथे

### तब्बल २६ तोळे सोने रिकव्हर करण्यात मोहाडी पोलिसांना यश



दैनिक आपला विदर्भ

**धुळे/प्रतिनिधी :**मध्यप्रदेशातील राजगढ़ जिल्ह्यातील गुलखेती गावाकडे जाणाऱ्या रस्त्यालगत जंगलातील एका झोपडीत मोहाडी पोलिसांच्या पथकाने छापा टाकला असता, पोलिसांना पाहून चोरटे पसार झाले. मात्र तेथील तपासणीत धुळ्यातील हॉटेल कृष्णा रिसोर्ट येथील लग्न समारंभात चोरीस गेलेले २६ तोळे सोने हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले.

प्रतिभा राजेंद्र बोरसे यांची मुलगी सलोनी राजेंद्र बोरसे हिचा लग्न समारंभ २ डिसेंबर २०२४ रोजी हॉटेल कृष्णा रिसोर्ट येथे पार पडला, लग्नातील कार्यक्रमातून २६ तोळे सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम असा १५ लाख ९८ हजार रुपये किंमतीचा ऐवज लंपास करण्यात आला. चोरी करण्यासाठी एका लहान मुलाची मदत घेण्यात आल्याचे पोलिसांच्या प्राथमिक तपासणीतून समोर आले होते. याप्रकरणी मोहाडी पोलिसात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता, लग्न समारंभात चोरी करणारी टोळी ही मध्यप्रदेश राज्यातील राजगड जिल्ह्यातील बोडा पोलीस ठाणे अंतर्गत असल्याची माहिती मिळाली त्यानुसार ही कारवाई करण्यात आली आहे.

गुलखेडी गावाकडे जाणारा रस्तालगत जंगलातील झोपडीत टोळीचे वास्तव्य असल्याची माहिती मिळताच बोड़ा पोलिसांची मदत घेऊन छापा टाकण्यात आला. पोलिसांना पाहून चोरटे पसार होण्यात यशस्वी ठरले. नंतर झोपडीची कसून तपासणी केली असता त्यात हॉटेल कृष्णा रिसोर्ट येथील लग्न समारंभातील चोरीस गेलेले २६ तोळे सोन्याचे दागिने मिळून आले. मात्र आरोपी फरार झाल्याची माहिती पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी यावेळी दिली.

## बुलढाण्यातील सैलानीत सोमवती अमावस्या निमित्त भाविकांची गर्दी

**बुलढाणा/प्रतिनिधी :** बुलडाणा जिल्ह्यातील सर्वात मोठी आणि प्रसिद्ध असलेली सैलानी बाबाची यात्रा ही नारळाच्या होळीसाठी ओळखली जाते. या शिवाय वर्षाच्या शेवटची सोमवती अमावस्या आणि नवीन वर्षाची सुरुवात चांगली व्हावी यासाठी आजपासून सैलानीत हि हजारो भाविकांनी गर्दी केली आहे.

सर्व धर्मांचे श्रद्धास्थान असलेल्या सैलानी बाबाच्या समाधीचे आज अमावास्येला हजारो भाविकांनी दर्शन घेतले.सैलानी बाबा दर्गाच्या दर्शनासाठी देशाच्या कानाकोपर्यातून हजारोंच्या संख्येने भाविक येत असतात. परंतु आजच्या अमावास्येला फार महत्त्व आहे. कितीही संकट आले तरी या संकटाला न जुमानता अमावास्येला सैलानी बाबाच्या दर्शनासाठी लाखोंच्या संख्येने भाविक येऊन सैलानी बाबाच्या दर्ग्यावर नतमस्तक होतात व सैलानी बाबांच्या झिर्याच्या पाण्याने अंघोळ करून सैलानी बाबाच्या समाधीवर गल्फ फूल, चादर चढवतात तसेच घराकडे परतीला जात असताना सैलानी बाबांच्या झिर्यांचे पाणी तीर्थ म्हणून सोबत घेऊन जात असतात.

## वन नेशन वन इलेक्शन अध्यादेश रद्द करा आणि अमित शहा यांनी राजीनामा द्यावा; डाव्या पक्षांचे जिल्हाधिकारी कार्यालयावर निदर्शने

दैनिक आपला विदर्भ




**अकोला/प्रतिनिधी :** केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल केलेल्या कथित अवमानकारक विधानाविरोधात आणि केंद्र सरकारने मांडलेल्या वन नेशन वन इलेक्शन धोरणाच्या निषेधार्थ आज अमरावती जिल्हाधिकारी कार्यालयावर डाव्या पक्षांच्या वतीने जोरदार निदर्शने करण्यात आली. भारतीय कम्युनिस्ट पक्ष, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष आणि डाव्या आघाडीने या निदर्शनांचे नेतृत्व केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांविरोधात केलेल्या विधानामुळे देशभर संताप व्यक्त केला जात आहे. या पार्श्र्वभूमीवर गृहमंत्री अमित शहा यांनी माफी मागावी आणि गृहमंत्री पदाचा राजीनामा द्यावा, अशी मागणी यावेळी आंदोलकांनी केली. वन नेशन वन इलेक्शन धोरणाला विरोध करत निदर्शकांनी या अध्यादेशामुळे संघराज्य प्रणालीवर थेट हल्ला होत असल्याचा आरोप केला. हा प्रस्ताव राज्य विधानमंडळाच्या अधिकारांवर गदा आणणारा आणि लोकशाही मूल्यांना बाधा पोहोचवणारा असल्याने तातडीने रद्द करण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली. या निदर्शनांमध्ये मोठ्या प्रमाणावर कार्यकर्ते सहभागी झाले होते. लोकशाही आणि संविधान वाचवण्यासाठी डाव्या पक्षांचा लढा सुरूच राहणार असल्याचे आंदोलकांनी सांगितले.

